# मेट्रो-3 सुस्साट...

## पाच कंपन्यांना मिळाले प्रकल्पाच्या बांधकामाचे कंत्राट

**मुंबई (प्रतिनिधी) :** 'मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन'द्वारे (एमएमआरसी) उभारल्या जाणाऱ्या मेट्रो-३ प्रकल्पाला वेग मिळाला आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ या ३३.५ कि.मी. लांबीच्या मेट्रो-३ मार्गाचे बांधकाम कंत्राट देण्यास एमएमआरसीच्या मंडळाने मान्यता दिली असून पाच कंपनी समूहाला कंत्राट देण्यात आले. मंगळवारी पार पडलेल्या एमएमआरसीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मेट्रो-३ हा राज्यातील प्रथम भुयारी प्रकल्प असून या मार्गावर २६ भुयारी आणि एक जमिनीवरील स्थानकाची रचना करण्यात येणार आहे.

मेट्रो-३चे बांधकाम एकूण ७ टप्प्यांत करण्यात येणार असून त्यानुसार पाच कंपन्यांमध्ये कंत्राट विभागण्यात आले आहे. मंगळवारी पार पडलेल्या बैठकीत एस.के.गुप्ता (संचालक), आर. रमणा कार्यकारी संचालक (नियोजन) आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ७ टप्प्यांमध्ये होणाऱ्या बांधकामासाठी १८,११४.९ कोटी खर्च अपेक्षित आहे. 'जायका'कडून या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य मिळणार आहे. २०२२-२१ सालापर्यंत मेट्रो-३चे बांधकाम संपवत प्रकल्प सुरू करण्याचे नियोजन आहे. मेट्रो-३च्या उभारणीसाठी लागणाऱ्या जमिनींपैकी ८३ टक्के जमीन संपादित करण्यात आली असल्याचे एमएमआरसीद्वारे सांगण्यात आले.

### मेट्रो-३चे वैशिष्ट्य

मुंबईच्या दक्षिण आणि उत्तर टोकाला जोडण्यासाठी मेट्रो-३ महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नरिमन पॉइंट, बीकेसीसारखी व्यापारी केंद्रे, आंतरराष्ट्रीय विमानतळ, एमआयडीसी आणि सीप्झसारखा औद्योगिक भाग मेट्रोमुळे जोडला जाईल. उपनगरीय रेल्वेद्वारे न जोडला गेलेला काळबादेवी, वरळी, प्रभादेवीसारखा भागही जोडला जाईल. पश्चिम, मध्य रेल्वे, मोनोरेल आणि मेट्रो-१ला मेट्रो-३ची स्थानके जोडली जाणार आहेत. मेट्रो-३ सुरू झाल्यानंतर दिवसाला १४ लाख प्रवासी प्रवास करतील. तसेच रस्त्यावरील वाहतूक कोंडीमध्ये घट होण्यास मदत होणार असून ४ लाख ५६ हजार ७७१ वाहने घटणार असल्याचा अंदाज एमएमआरसीतर्फे व्यक्त करण्यात आला. यामुळे दररोज २४३,३९० लिटर इंधनाची बचत होईल. या सर्वांमुळे वायू आणि ध्वनी प्रदूषणात घट होण्यास मदत होईल.



### असे होणार मेट्रो-३चे बांधकाम

- मे. एल ॲण्ड टी-एसटीईसी, टप्पा-१ (२,९८८.५३ कोटी) : कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक स्थानके
- मे. एचसीसी-एमएमएस, टप्पा-२ (२५२१.८९ कोटी) : सीएसटी मेट्रो, काळबादेवी, गिरगाव, ग्रॅन्ट रोड स्थानके
- मे. डोगस-सोमा, टप्पा-३ (२५५७.८४ कोटी) : महालक्ष्मी मेट्रो, मुंबई सेंट्रल, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे आणि वरळी स्थानके
- मे. सीएसी-आयटीडीसीएम-टीपीएल, टप्पा-४ (२८३०.१० कोटी) : सिद्धिविनायक, दादर मेट्रो, शीतलादेवी स्थानके
- मे. जे. कुमार-सीआरटीजी, टप्पा-५ (२८८१७.०२ कोटी) : धारावी, बीकेसी मेट्रो, विद्यानगरी, सांताक्रूझ स्थानके
- मे. जे. कुमार-सीआरटीजी, टप्पा-६ (२११८.४० कोटी) : छत्रपती शिवाजी एअरपोर्ट (आंतरराष्ट्रीय), सहार रोड, छत्रपती शिवाजी एअरपोर्ट (आंतरराष्ट्रीय)
- मे. एल ॲण्ड टी-एसटीईसी, टप्पा-७ (२२८१.४५ कोटी) : मरोळ नाका, एमआयडीसी, सीप्झ स्थानके